## रयत शिक्षण संस्था, सातारा

## पाहिजेत

## [शैक्षणिक वर्ष २०१८ - १९ करीता ]

रयत शिक्षण संस्थेमार्फत चालविल्या जात असलेल्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये इत्यादी विभागाकडील अनुदानित, विनाअनुदानित /कायम विना अनुदानित, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील संभाव्य रिक्त पदावर घड्याळी तासिका तत्वावरील व रजा कालावधीत शिक्षकांच्या हंगामी/ तात्पुरत्या स्वरूपातील नेमणुका शैक्षणिक वर्ष २०१८ - २०१९ साठी करावयाच्या आहेत.

जाहिरातीमधील जागा या केवळ हंगामी व तात्पुरत्या स्वरुपाच्या असून, संभाव्य असल्यामुळे यामध्ये बदल होऊ शकतो. त्यामध्ये काही जागा कमी, जास्त अथवा काही जागा रद्द होण्याची शक्यता आहे. त्याबाबतचा वेगळा खुलासा जाहिरातीद्वारे वा अन्य मार्गाने करण्यात येणार नाही. रिक्त पदांची उपलब्धता आणि आवश्यकत्तेनुसार नेमणुका केल्या जातील. याची नोंद घ्यावी.

### १] नियम व अटी / आवश्यक शैक्षणिक अर्हता –

**अ) प्राथमिक विभाग – उपशिक्षक (Assistant Teacher - Primary)**

१. डी.एड / डी.टी.एड (इयत्ता ५ वी पर्यंतचे सर्व विषय)

**ब) उच्च प्राथमिक / माध्यमिक – उपशिक्षक (Assistant Teacher - Secondary)**

१. बी.ए./ बी.कॉम./ बी.एस्सी, डी.एड./ डी.टी.एड (इयत्ता ६ वी ते ८ वी पर्यंतचे सर्व विषय)

२. ए.टी.डी. – चित्रकला

३. बी.ए. बी.एड./बी.पी.एड:-इंग्रजी, मराठी, हिंदी, भूगोल, इतिहास, संस्कृत, शारीरिक शिक्षण (इयत्ता ९ वी, १० वी )

४. बी.एस्सी.बी.एड. 'ए' ग्रुप- गणित, भौतिकशास्त्र (इयत्ता ९ वी, १० वी )

५. बी.एस्सी.बी.एड. 'बी' ग्रुप- रसायन, प्राणीशास्त्र व वनस्पतीशास्त्र, (इयत्ता ९ वी, १० वी )

**क) उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये - उच्च माध्यमिक शिक्षक (Junior College Teacher)**

१. एम.ए.II बी.एड / एम.पी.एड - इंग्रजी, मराठी, हिंदी, संस्कृत, अर्धमागधी,इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र,तत्वज्ञान, पर्यावरण, समाजशास्त्र व शारीरिक शिक्षण

२. एम.कॉम. ॥ बी.एड.- वाणिज्य, लेखाकर्म व पुस्तकपालन, सहकार, संख्याशास्त्र व लेखापरीक्षण.

३. एमएस्सी. ॥, बीएड- गणित, रसायन, भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, पर्यावरण, पीकशास्त्र, पीक उत्पादन व कृषी तंत्रज्ञान

४. माहिती तंत्रज्ञान, संगणकशास्त्र, तंत्रशिक्षण मंडळ यांची संगणक शास्त्र विषयाची पदवी/ विद्यापीठाची संगणक शास्त्र / माहिती तंत्रज्ञान विषयाची पदवी

**ड)** १. जाहिरातीतील नमूद केलेल्या पदासाठी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांनीच अर्ज करावेत. अपात्र व चुकीचा अर्ज भरल्यास कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२. मागासवर्गीय उमेदवारांनी जातीचा दाखला, जाती वैधता प्रमाणपत्र जोडावे.

३. खुला व मागासवर्गीय उमेदवारापैकी कोणी अपंग किंवा प्रकल्पग्रस्त असल्यास प्रमाणपत्र जोडावे.

४. उमेदवारांनी यापूर्वी संस्थेत अगर अन्यत्र काम केले असल्यास अनुभवाची माहिती बिनचूक भरावी.

५. या जाहिरातीनुसार तुम्ही केलेल्या सेवेचा भविष्यामध्ये कायम नियुक्तीसाठी हक्क सांगता येणार नाही.

६. सदरच्या नियुक्त्या ह्या नियमित व कायमस्वरूपी रिक्त पदावरील नसून त्या हंगामी व तात्पुरत्या स्वरूपाच्या राहतील.

## २] अर्ज करण्याची पद्धत

१. उमेदवारांनी जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.

२. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज ज्या पदासाठी भरणार आहे, त्या पदाची पात्रता जाहिरातीमध्ये काळजीपूर्वक वाचावी व योग्य तोच विभाग निवडून अर्ज भरावा.

३. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतेवेळी सर्व आवश्यक कागदपत्रे आणि स्वत:चा अलीकडील काळातील पासपोर्ट साईज फोटो व सहीची Scanned image स्वत: जवळ असल्याची खात्री करावी. फॉर्म व सहीची Image upload करावी लागेल.

## ३]. ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी

i) **http://rayat.erecruitment.co.in** या संकेतस्थळाला भेट द्या.

ii) नोटिफिकेशन / जाहिरात पहा.

iii) होम पेज वरून ‘Register’ करा.

iv) Registration करताना मिळालेल्या Login ID चा वापर करून आपले Profile पूर्ण करा.

v) तुम्ही पात्र असलेली पदे निवडा. (उमेदवार एकाचवेळी एकापेक्षा जास्त पदांसाठी अर्ज करू शकतात.)

vi) एक अथवा अनेक पदे यापैकी योग्य पर्यायाची निवड करून फी भरा.

vii) फी जमा झाल्यावर अर्जाची प्रिंट काढा.

**वरील सविस्तर माहिती वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

viii) नेट बँकिंग/ डेबिट किंवा क्रेडीट कार्ड द्वारे अर्जाचे शुल्क दिलेल्या कालावधीतच जमा करावे. एकदा भरलेले शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.

ix) उमेदवारांनी त्यांचे रहिवाशी जिल्ह्याचे विभागासाठीच फक्त अर्ज करावयाचा आहे. अन्य विभागासाठीचा अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

x) ऑनलाईन अर्जाचे शुल्क सर्वांसाठी रुपये ६०/-[अक्षरी रु.साठ फक्त] राहील.

xi) उमेदवारांनी जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केली असली तरीही उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरणे बंधनकारक आहे. तसेच नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली छायांकित प्रत स्कॅन करून सोबत जोडावी.

xii) मुलाखतीचे वेळी ऑन लाईन अर्जाची प्रिंट काढून गुणपत्रके, प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती सोबत जोडाव्यात.

वरील सर्व माहिती अर्जामध्ये भरावी. ती भरल्याशिवाय आपला अर्ज पूर्ण होणार नाही. माहिती भरल्यानंतर अर्जाची प्रिंट काढून, आपल्या माहितीसाठी जतन करून ठेवावी. ऑनलाईन अर्ज पूर्ण भरल्यानंतर अर्जाची प्रत सबंधित रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय, आदिवासी विकास कार्यालय किवा **MKCL** किवा रयत शिक्षण संस्थेकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. तुमची अर्ज प्रक्रिया येथे पूर्ण होते.

**४] निवड पद्धती**

प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये इत्यादी विभागाकडे अर्ज केलेल्या उमेदवारांच्या विभागवार, तोंडी मुलाखती गुणवत्तेवर आधारित घेऊन निवड केली जाईल. त्या अगोदर मूळ गुणपत्रके, प्रमाणपत्रे तपासणी होईल. याकरिता कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च दिला जाणार नाही. उमेदवारांना नियुक्तीसाठी त्यांचे सोयीचे ५ शाखांची गावाची नावे प्राधान्यक्रमाने देता येतील. याचा सोयीने नियुक्ती देणेकामी विचार होईल. उमेदवारांच्या माहितीसाठी सोबत संस्थेच्या जिल्हावार शाखांची यादी

जोडली आहे. उमेदवारांची नियुक्ती उपलब्ध जागा व विषयाची गरज विचारात घेऊन करण्यात येईल. तसेच ती तात्पुरती असेल. उमेदवाराचे चारित्र्य गैरवर्तणुकीचे आढळल्यास त्याची नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज पूर्ण भरल्यानंतर अर्जाची प्रत [ हार्ड कॉपी ] काढून, प्रथम अर्ज व तदनंतर खालील क्रमानेच कागदपत्रे जोडून तपासणीसाठी देण्याची दक्षता घ्यावी.

१. जन्म तारखेचा / शाळा सोडल्याचा दाखला, एस.एस.सी.बोर्ड प्रमाणपत्र.
२. शैक्षणिक अर्हता गुणपत्रके व प्रमाणपत्रे.[पदवी, पदव्यूत्तर पदवी, अध्यापन पदवी/पदविका]
३. मागासवर्गीय असल्यास जातीचा दाखला व जाती दावा वैधता प्रमाणपत्र.
४. प्रकल्पग्रस्त /अपंग असल्यास प्रमाणपत्र.
५. उन्नत व प्रगत [Creamy Layer] गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र.

**५] अर्ज भरण्याची विहित मुदत:**

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १. | अर्ज ऑनलाईन नोंदणी करण्याचा कालावधी | दि.२५/०५/२०१८ ते ०३/०६/२०१८ | |
| २. | नेट बँकिंग (कोणतेही बँक) / डेबिट किंवा क्रेडीट कार्डद्वारे फी स्वीकृती कालावधी | | |

**<u>६]. मुलाखतीचे ठिकाण व तारीख :-</u>**

उमेदवारांनी ज्या विभागासाठी अर्ज केलेला आहे. त्या विभागानुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार खाली दिलेल्या ठिकाणी दिलेल्या तारखेस गुणपत्रके / प्रमाणपत्रे तपासणीसाठी मूळ कागदपत्रासह सकाळी ९.०० वाजता उपस्थित रहावे.

<u>१) मध्य विभाग</u> - महाराजा सयाजीराव विद्यालय,कर्मवीर समाधी परीसर सातारा. (०२१६२/२३४२७९) (सातारा, सोलापूर, जालना, भंडारा, हिंगोली, अकोला व अमरावती जिल्ह्यातील रहिवासी उमेदवारांनी या ठिकाणी उपस्थित रहावे.)

**अ) कनिष्ठ महाविद्यालय / उच्च माध्यमिक विभाग - दि.०६/०६/२०१८**

**ब) प्राथमिक / माध्यमिक विभाग - दि.०७/०६/२०१८**

**<u>२) दक्षिण विभाग</u>** - महात्मा गांधी विद्यालय आष्टा,ता.वाळवा,जि.सांगली.(०२१४२/२४३२४०) (सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, बेळगाव, उस्मानाबाद, लातूर व परभणी जिल्ह्यातील रहिवासी उमेदवारांनी या ठिकाणी उपस्थित रहावे.)

**अ) कनिष्ठ महाविद्यालय / उच्च माध्यमिक विभाग - दि.०६/०६/२०१८**

**ब) प्राथमिक / माध्यमिक विभाग - दि.०७/०६/२०१८**

**३)पश्चिम विभाग-** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,औंधगाव,पुणे-७ (०२०/२५८८८७०३) (पुणे, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, अमरावती, यवतमाळ व नांदेड जिल्ह्यातील रहिवासी उमेदवारांनी या ठिकाणी उपस्थित रहावे.)

**अ) कनिष्ठ महाविद्यालय / उच्च माध्यमिक विभाग - दि.११/०६/२०१८**

**ब) प्राथमिक / माध्यमिक विभाग - दि.१२/०६/२०१८**

**४)उत्तर विभाग** - रयत शिक्षण संस्थेचे, राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर (०२४१/२३५५४०४/२४३०३१८) (अहमदनगर, नाशिक, बीड, नंदुरबार, बुलढाणा, गोंदिया, व औरंगाबाद जिल्ह्यातील रहिवासी उमेदवारांनी या ठिकाणी उपस्थित रहावे.)

**अ) कनिष्ठ महाविद्यालय / उच्च माध्यमिक विभाग - दि.११/०६/२०१८**

**ब) प्राथमिक / माध्यमिक विभाग - दि.१२/०६/२०१८**

**५)रायगड विभाग-** रयत शिक्षण संस्थेचे, मॉडर्न स्कूल, वाशी,सेक्टर ७, नवी मुंबई(०२२/२७८२१३४६) (रायगड, पनवेल, मुंबई शहर, ठाणे, पालघर, धुळे व जळगाव जिल्ह्यातील रहिवासी उमेदवारांनी या ठिकाणी उपस्थित रहावे.)

**अ) कनिष्ठ महाविद्यालय / उच्च माध्यमिक विभाग - दि.०६/०६/२०१८**

**ब) प्राथमिक / माध्यमिक विभाग - दि.०७/०६/२०१८**

**प्रिं.डॉ.भाऊसाहेब कराळे**
**सचिव,**
**रयत शिक्षण संस्था, सातारा**

**तारीख :-२५/०५/२०१८**
**दिनांक :- सातारा**